# अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिक पूर्व शिष्यवृत्ती योजना

अल्पासंख्यांक समाजाच्या कल्याणासाठी मा. पंतप्रधान यांनी घोषित केलेल्या १५ कलमी कार्यक्रमानुसार केंद्र शासनाने अल्पसंख्यांक समाजातील गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांसाठी 'मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना' लागू केली आहे. अल्पसंख्यांक समाजातील आर्थिक दृष्टया दुर्बल असलेल्या इयत्ता १ ली ते १० वी या वर्गातील गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांच्या विकासाठी ही योजना असून अल्पसंख्यांक समाजातील आर्थिक दृष्टया मागास गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांना इयत्ता १ ली ते १० वी पर्यंत शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे. विद्यार्थ्यांची मोठया प्रमाणावर होणारी गळती थांबावी तसेच अल्पसंख्यांक पालकांना त्यांच्या पाल्यांना शाळेत पाठविण्यास उत्तेजन देण्यासाठी ही योजना आहे.

यामुळे अल्पसंख्यांक मुलांच्या पालकांच्या पाल्याच्या शिक्षणावर होणारा भार कमी होईल. शिक्षणाद्वारे या मुलांचे सक्षमीकरण करणे हा या योजनेचा हेतु आहे. सदर योजना ११ व्या पंचवार्षिक योजनेतील सन २००८-०९ या आर्थिक वर्षापासून कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र राज्यातील अल्पसंख्यांक **'मुस्लिम, ख्रिश्चन, शिख, बौध्द, पारशी'** समाजातील गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्या मॅट्रिक पूर्व शिष्यवृत्तीयोजनेस शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून लाभ मिळत आहे. सदर योजना राज्यातील इयत्ता १ ली ते १० वी च्या सर्व शासकीय/निमशासकीय/खाजगी शाळांमधून (कायम विनाअनुदानीत शाळा वगळून)शिक्षण घेणा-या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी लागू आहे.

वरील योजनेसाठी

शालेय शिक्षण क्रिडा व युवक कल्याण विभाग,

शासन निर्णय क्रमांक पपंका-२००७/(२७०/०७)असंक

मंत्रालय विस्तार भवन मुंबई ४०००३२

दिनांक २३ जुलै २००८

**www.maharashtra.gov.in**